# **४१ . बदल ( Change )**

काही दिवसांपूर्वी मी बॅंक अधिका-यांच्या प्रशिक्षण वर्गात ‘ बदल ’ ह्या विषयावर व्याख्यान देत होतो . अर्थात विषयाचे विवेचन बॅंकींग क्षेत्रातील बदलासंबंधी सीमीत होते . बॅंकींग क्षेत्रातील बदलांचा मी मागोवा घेतला . रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडिआ चे नियंत्रण कसे बदलत गेले , बॅंकांना कशी निर्णय घेण्याची मुभा दिली गेली , व्याजात व इतर सेवा संदर्भात होणारे बदलही सांगितले . तसेच तंत्रज्ञानात कसे बदल होत गेले व आपल्याला कोणते बदल करणे आवश्यक आहे ह्याचे महत्व समजाविले . तसेच ग्राहकांच्या दृष्टीकोनातही कसा बदल झाला आहे व त्यांच्या बॅंकेकडून अपेक्षा कशा उंचावल्या आहेत हे नमूद केले . ह्या सर्व बदलामुळे अधिकारी वर्गाने स्वतःला कसे बदलले पाहिजे , नवीन तंत्रज्ञान कसे आत्मसात केले पाहिजे , व्यवस्थापनातील नवीन आव्हाने कशी स्वीकारली पाहिजेत वगैरे .

व्याख्यान संपण्यापूर्वी मी ‘ बदल’ ह्या विषयाचा आवाका नमूद केला .

‘बदल’ हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे . बदल माणसात , निसर्गात सदैव घडत असतात . बदलाचा सामना करायचा असेल तर बदलाचा मागोवा घ्यावा लागतो . कोणते बदल घडणार आहेत ? कोणत्या बदलावर आपले नियंत्रण नाही ? आपल्याला कोणते बदल घडविणे गरजेचे आहे ? कारण आपण जर बदललो नाही तरीही बदल आपल्यावर लादले जाणारच आहेत व मग आपली परिस्थिती अगदीच केविलवाणी होईल त्यामुळे आपण स्वतःबदलून होणा-या बदलांवर विजय मिळवून प्रगती करणे गरजेचे आहे . असे करून थांबायचे मात्र नाही . सदैव बदलासाठी तयार राहिले पाहिजे व बदलांचा आनंद घेतला पाहिजे .

अधिका-यांना हे ‘ बदलाचे व्यवस्थापन’ फारच आवडले व प्रत्येकाने ह्या विवेचनानुसार वागायचे वचन दिले .
भाषणानंतर चहापानाचा कार्यक्रम होता . अनौपचारीक संभाषण सुरूच होते . अधिकारीवर्ग साधारण ३० ते ३५ वयोगटाचा होता . काहीतरी विषय निघाला व मी म्हणालो की आमच्या काळी असे होते . सर्वांनी कान टवकारले व मी जे बदल बघितले ते सांगत गेलो . त्यांच्या तर विश्वास बसत नव्हता . कित्येक अधिकारी म्हणाले की आम्हाला आमच्या वडिलांनी , काकांनी फारश्या जुन्या गोष्टी सांगितल्या नाहीयेत . मग आमची परत एकदा मैफल जमली व मी अनुभवलेले बदल ह्या विषयावर माझे परत एकदा भाषण झाले .

मित्रांनो ह्याच भाषणाचा गोषवारा मी तुम्हाला सांगणार आहे .
साधारणपणे मला आठवण असल्यापासून म्हणजे १९५८ पासूनच्या ह्या गमजी सांगतो आहे .

१. पूर्वी रस्त्यांवर ट्रॅम होती . शिवाजी टर्मिनल्स पासून माटूंग्यापार्यंत . रस्त्याच्या मध्ये रूळ असत . त्यावरून डबलडेकर ट्रॅम धावे . वेग अगदी नेरळ माथेरानगाडी एवढाच . वरच्या मजल्यावर बसले तर छान वारा येई .

माटूंग्याला ट्रॅम पोचली की बाकांच्या मागची पाठ टेकायची पट्टी उलटी केली की ट्रॅम उलट प्रवासाला निघे. ट्रॅमची दिशा बदलण्याची गरज नसे कारण ट्रॅम दोनही दिशांनी चालू करण्याची सोय होती. वाहनचालकाला उभे राहूनच ट्रॅम चालवावी लागे. माझे आजोळ माटूंग्याला व आम्ही गिरगावात राहत असल्यामुळे बरेच वेळा ट्रॅममधून प्रवास केला आहे. जर एखादी ट्रॅम बंद पडली तर मात्र वाहतुकीचा खोळंबा.

२. काही वर्षांनी ट्रॅम बंद झाली. रस्त्याच्या मधील रूळ काढून टाकण्यात आले. रस्ता रूंद झाला. मग विजेवर चालणारी बस बीईएसटीने सुरू केली. रेल्वेप्रमाणेच विजेची केबल असे व बसच्या मागे आपण पतंगाच्या मांज्याचे रिळ असते तसे केबलचे रिळ असे. बस जर हवेतील केबलच्या बाजूने चालू लागली तर रिळातून केबल सरकली जाई. गिरगाव ते ग्रॅंटरोड मार्गावर ह्या बसेस चालत. परंतु ह्या बसमध्ये वारंवार तांत्रिक अडचणी येऊ लागल्यानंतर हा प्रयोग बंद झाला. हवेतील केबलही काढून टाकल्या गेल्या.

३. पूर्वी रेडिओ , ट्रॅनझिष्टर विकत घेताना लायसन्स काढावे लागत. वार्षिक १५ रू. फी पोष्टात जमा कारावी लागे. त्याकाळचे १५ रू. म्हणजे ज्यास्तच कर होता.

४. पूर्वी अन्नधान्य रेशनवरच मिळे. तांदुळ , गहू , साखर , तेल , रॉकेल. वाण्याच्या दुकानात हे जिन्नस उपलब्ध नसत. रेशनच्या दुकानात हे धान्य मिळण्याचा कोटा माणसागणिक सरकारने ठरविला होता. घरात जन्मलेल्या बाळाची नोंद रेशनकार्डवर करावी लागे व त्याला ½ युनिट धरत. मोठा झाला की परत कळवावे लागत असे. पूर्वीच्या काळी रेशनींग इस्पेक्टरला काय भाव होता ? ( दोन्ही अर्थांनी ) हे धान्य दर पंधरा दिवसांनी घ्यावे लागे. हे धान्य रेशनच्या दुकानात कधी येणार आहे ह्याची चौकशी सतत करावी लागे. ज्या दिवशी धान्य येईल त्याच्या दुसऱ्या दिवशी दुकानासमोर रांगच रांग लागे. पहाटे ४ पासून रांग लावावी लागे. घरात आम्ही सख्खी , चुलत मिळून ५ भावंडे. आळीपाळीने एक एक तास उभे राहत असू. वडिल दुकान उघडायच्या वेळी येत व आमची वरात रेशन घेऊन एखादा मुलूख जिंकून परतणाऱ्या सेनेसारखी घरी येई.

गंमत म्हणजे एक दिवशी सर्व धान्य मिळत नसे. कधी नुसतेच तांदुळ , साखर मिळे. परत गव्हासाठी लाईन लावावी लागे. बालपणचा बराच काळ रेशनच्या लायनीत उभे राहून घालवला आहे. वर्गात कधी उभे राहण्याची शिक्षा मिळायची नाही पण सरकारने प्रत्येकासाठी ह्या शिक्षेची सोय केली होती. मित्रांनो तुम्हाला आश्र्चर्य वाटेल कि लायनीत आपल्या नंबरचा दगड ठेवून रस्त्याचरच्या दिव्याच्या प्रकाशात सकाळच्या वेळी थोडाफार अभ्यासही केला आहे. ह्या गव्हाची पण एक गंमत आहे. हा गहू अमेरीकेतून आयात केला जाई. हा गहू अमेरीकत जनावरांना खायला देत. तो गहू भारताला आयात करावा लागे. त्या कराराचे नाव आजही माझ्या लक्षात आहे. पी. एल. ४८०.

५. नाटकाचे तिकिटाचे दर ५ , ३ , २ असे होते. ३ रूपयात बाल्कनीतून नाटक छान दिसे.

६. माझे वडिल १९६९ ला वारले त्याच वर्षी ते निवृत होणार होते. जवळजवळ ४० वर्षे बीएमसीत स्टेनोटायपिस्ट चे काम केल्यानंतर निवृतीच्या वेळी त्यांना ८०० रूपये पगार होता.

७. मी १९७१ साठी सीए ची आरटीकल्स करायला लागलो तेव्हा मला ४० रू. वेतन होते त्यापैकी मी त्याकाळी ५ ते १० रू. मौजमजा करूनसुद्धा महिन्याला वाचवू शकत होतो.

८. सीए १९७४ ला पास झालो. संपूर्ण भारतात मला ४८ वी ग्रेड मिळाली. आरटीकल्स संपल्यानंतर जून १९७५ ला क्रॉम्प्टन ग्रीव्हज कंपनीत अधिकारी म्हणून रूजू झालो तेव्हा मला रू. १२५०/- पगार होता. ( इंडस्ट्री मधील नवीन सीए साठी हा सर्वात जास्त पगार होता )

९. त्यावेळी आयकाराचा दर ४० टक्के होता. पगाराच्या ३० % च बचत ( एलआयसी / पीपीएफ ) करता येई. त्यामुळे प्रत्येकाला आयकर भरावाच लागे.

१०. त्यावेळी (१९७५) मी गिरगावातून दादरला ट्रेन बदलून कांजूरमार्गला जात असे. ट्रेनची सेवा आतासारखीच बेभरवशाची होती. त्यामुळेच कित्येकवेळा मी रात्री कांजूरमार्गहून ठाण्याला बहिणीकडे मुक्कामाला जात असे.

११. रेशनप्राणेच दूधही दुर्लभ वस्तु होती. आजच्यासारखे दूध घालणारे भैये नव्हते. दुधाचे कार्ड आरे डेयरीतून घ्यावे लागे. प्लास्टीकचे कार्ड असे. सकाळी आरेच्या दुधाच्या स्टॉलवरून काचेच्या बाटल्यातून दूध आणावे लागे. टोन व होल असे दोन प्रकारचे दूध मिळे. स्टॉलवर कंदिल असे. हल्ली ह्या स्टॉलवरून लस्सी , एनर्जी , तूप याची विक्री होते. स्टॉल मात्र आहेत तसेच आहेत. लाकडयाच्या फळकुटानी बनविलेले. दुधाचे कार्ड काढण्यासाठी त्याकाळी वशिला लावावा लागे. घरी सत्यनारायण असला म्हणजे केळीचे खांब उभे करण्यासाठी ह्या दुधाच्या बाटल्यांचा उपयोग होई. तसेच सुर्यग्रहण ह्या दुधाच्या प्लॅस्टीक कार्ड मधून चांगले दिसे. हल्लींच्या सारखा गॉगल विकत घ्यावा लागत नसे.

१२. त्याकाळी मी १९७४ ला सीए पास झालो तेव्हा विद्यार्थांना कॅल्क्युलेटर वापरायची बंदी होती. सीए च्या परिक्षेत हिशेबाची गणिते असत पण कॅल्क्युलेटर शिवाय लॉगेरिदम टेबलचा उपयोग करून ती सोडवावी लागत.

१३. नोकरी लागल्यानंतर पहिल्या पगाराचा कॅसिओचा कॅल्क्युलेटर विकत घेतला. किंमत ३०० रू. म्हणजे पगाराच्या २५ % टक्के.

१४ . त्याकाळी कंपनीत कॅल्क्युलेटर चे काम करण्यासाठी वेगळा कर्मचारी वर्ग असे व त्यांच्याकडे २' × २' आकाराचे प्रचंड मशिन असे . त्यावर हि आकडेमोड चालत असे .

१५ . एसटीडी ची सोय नव्हती . फोनच फारसे नसायचे . ट्रंककॉल करावा लागे . टेलिफोन एक्सचेन्ज मधून कधी नंबर मिळेल ह्याची खात्री नसायची .

१६ . पूर्वी टेलेक्स पाठवावा लागे . मजकूर टाईप करून ज्या कंपनीला टेलेक्स पाठवायचा असेल त्याचा फोननंबर लागण्याची वाट बघावी लागे . कधी कधी रात्री उशीरा नंबर लागल्यानंतर **Telax** जात असे .

१७ . आजच्यासारखी झेरॉक्स ची सोय नव्हती . टेन्ससिल कट करून साक्लोस्टायलिंग मशिनवर प्रिंट काढावे लागत . २५ % टक्के प्रिंट आऊट खराब येत व कागदाचे नुकसान होई .

१८ . फोनचे कनेक्शन लगेच मिळत नसे . मी १९८१ ला फोनसाठी बुकींग केले होते तो फोन मला १० – ४ – १९९१ ला मिळाला . महिन्यातून किती वेळा बंद असे त्याबद्दल न बोललेच बरे .

१९ . क्रॉम्प्टन ग्रीव्हज मध्ये इडीपी डिपार्टमेंट होते . संगणक चा आकार प्रचंड होता . जवळजवळ २० फूट लांब व १० फूट रूंद . संगणक रूममध्ये ठराविक लोकांनाच जाता येत असे .

२० . हॉटेलात जाणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात नव्हते . आज हॉटेलात गेलो नाही तर बुरसटपणाचे लक्षण मानले जाते .

२१ . घरात पाव आणणे कमीपणाचे लक्षण होते . तसेच पोळया करायला घरी बाई ठेवणे , बाहेरून पोळया आणणे हे तर शक्यच नव्हते .

२२ . केक , अंडी , बिस्कीटे खाणे म्हणजे पाववाला होण्याची लक्षणे समजली जात .

२३ . क्लासला जाणे म्हणजे आपण ‘ ढ ’ आहोत हे सर्वांना सांगण्यासारखे होते . आजमात्र क्लासाला जात नाही म्हणजे अपराध केल्याची भावना असते .

२४ . मित्रांनो सांगाल का तुम्ही अनुभवलेले बदल ?